*मौलिक विचार माला - ३१*

श्रीगुलाबरावमहाराजांचा महनीयांनी केलेला

# गौरव



**महनीयांनी गायिलेली महती**

*श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ दहीसाथ अमरावती*

**सहयोग : रामदासानी*

रु.५





## १
## सर्वस्पर्शी प्रज्ञा



१ वेद-द्रष्टा : समाधिस्थितीत वेदमंत्रांना पहाणारे
२ वेद-श्रोता : समाधिस्थितीत वेदमंत्र ऐकणारे
३ वेद-मीमांसक : आन्तर्विरोधाभासाचा समन्वय करणारे
०० वेदांचे अपौरुषेयत्व युक्ति व प्रमाणांनी सिद्ध करणारे
४ सूत्रग्रंथकार ऋषी : ९ सूत्रग्रंथ रचणारे
५ भाष्यकार : भागवत,सांख्यसूत्र,योगसूत्रे इ.वर भाष्य करणारे
६ आकरग्रंथकार : संप्रदायसुरतरूचे लेखन
७ धर्माचार्य व भक्त्याचार्य
* देवर्षी नारदांच्या आज्ञेने भक्ती व धर्माच्या स्थापनेसाठी प्रत्येक कलियुगात अवतरणारे
* सर्व-धर्मांच्या उत्पत्तीची प्रक्रिया सांगणारे
* सर्व धर्मांचा परस्पर समन्वय करणारे
८ पुराणाचार्य : पुराणांवर सूत्रग्रंथ रचणारे
९ षड्दर्शनांवरील भाष्यकार आचार्य
* वेद-पुराण-धर्म-दर्शन-शास्त्रे व संतवचनांतील विरोधाचा परिहार करून समन्वय करणारे





१० मधुराद्वैताचार्य
* ''मधुराद्वैत-दर्शनाचे'' उद्घाटक
* भगवद्विग्रहालस
* ''अनध्यस्तविवर्त'' या नवीन संज्ञेने शांकर-अद्वैताला भक्तीने मधुर करणारे
* उपासना व भक्तीतील भेद दाखविणारे
* 'तत्त्वमसि'ने अद्वैतज्ञानानंतर याच महावाक्याने पराभक्ति-प्राप्तीचे विवेचन करणारे
* पराभक्ती म्हणजे माधुर्यभक्तीच्या
सर्वसमावेशकत्वाचे,
सर्वश्रेष्ठत्वाचे आणि
विषयभावरहितत्वाचे विवेचन करणारे
* 'तत्-सुख-सुखित्व' यावर भक्तीची स्थिती असल्याचे स्पष्ट करणारे
* सच्चिदानंदाच्या आनंदांशावर भक्तीची स्थापना करणारे
* भक्तीचे १६ प्रकार सांगणारे
११ सांख्यदर्शनाचार्य : ६ ग्रंथ.
* सेश्वर-सांख्याची सिद्धी करणारे
१२ योगदर्शनाचार्य : १० ग्रंथ :
* नवीन योगप्रक्रियाची निर्मिती करणारे
* कुंडलिनी-चक्रे इ.विषयीचा भ्रम दूर करणारे





* योगसाधनेत वेदमंत्र ऐकण्याचा मार्ग दाखविणारे
१३ न्यायदर्शनाचार्य
* न्यायाच्या प्रत्यक्षखंडातून आर्य-विज्ञानाच्या विकासासाठी मार्गदर्शन करणारे
* विज्ञानप्रगतीसाठी आस्तिक-नास्तिकांना एकत्र आवाहन करणारे
१४ पूर्वमीमांसाचार्य : २ सूत्र ग्रंथ
१५ मानसायुर्वेदाचार्य : ८ ग्रंथ
* नवा 'द्रव्य-गुण-सिद्धांत' मांडणारे
* ॲलोपथीच्या जंतुकारणवदाचे खंडन करणारे
मनोविकारकारणवाद सिद्ध करणारे
* मनोविकारांपासून रोग व रोगापासून विकार यांची माहिती सांगणारे
१६ शिक्षणाचार्य : १ ग्रंथ
* शिक्षणाची मूलभूत व्याख्या सांगणारे
१७ संगीताचार्य : २ ग्रंथ :
* संगीतशास्त्र निर्माते
* मार्गी व देशी संगीत स्पष्ट करणारे
* पं.भातखंडेंचे खंडन करणारे
१८ नवीन वृत्त-रचनाकार
१९ नवीन छंद-रचनाकार



(५)


२० नवे काव्यशास्त्र निर्माते
* कवी, गायक, काव्यज्ञ शास्त्ररचयिता असणारे
२१ नावंग भाषा-निर्माते
२२ व्याकरण-निर्माते : नावंग भाषेचे
२३ लिपी-निर्माते : सांकेतिक-लघु-लिपी
* भाषादोष वर्णन करणारे
२४ भगवद्विग्रहाला ‘‘अनध्यस्तविवर्त’’ ही नवीन संज्ञा देवून शांकर अद्वैताला भक्तीने मधुर करणारे
२५ त्रिभाषासूत्र सांगणारे
* संस्कृत-मातृभाषा व राजभाषा शिकण्याचे आवाहन करणारे
२६ संस्कृतात ग्रंथ लिहिणारे - ३२
* संस्कृतात पत्रे लिहिणारे - ११
* संस्कृतात गेय पदे लिहिणारे - ४१
* संस्कृतात स्तोत्रे लिहिणारे
२७ क्रीडा-निर्माते :
* परमार्थप्रक्रिया म्हणून मोक्षपट निर्मिणारे
२८ मानसशास्त्राला नवी दृष्टी देणारे
* मनो विश्लेषण करून उन्नतीचा मार्ग दाखविणारे
* भारतीय व पाश्चात्यांची तुलना करणारे
२९ चमत्कारांचा निषेध करणारे



*..................महनीयांनी केलेला गौरव..................*

(६)

३० बुवाबाजीचा दंभस्फोट करणारे
इतिहास
३१ इतिहासाला नवी दृष्टी देणारे
* इतिहास कसा लिहावा, *कोणी लिहावा, *कशावर विश्वास ठेवावा, याचे मार्गदर्शन करणारे
* स्व-उत्कर्ष-बोधक इतिहासच कां शिकावा, याचे मर्म सांगणारे
* आर्य भारतात बाहेरून आल्याचे खंडन करणारे
* आर्यांच्या आगम-निर्गमनाचे खंडन करणारे
* विश्वव्यापक आर्यसंस्कृतीचा सिद्धांत मांडणारे
* तीन हजार वर्षापूर्वी सर्व जगात आर्य-वैदिक संस्कृतीच होती हे सिद्ध करणारे
* शूद्रवर्ण आर्यांचाच एक भाग आहे, हे प्रमाणित करणारे
३२ पाश्चात्यांनी केलेले हिंदुसंस्कृतीचे विकृतीकरण संपवण्यासाठी समाजाला
* समर्थ वैचारिक अधिष्ठान देणारे
विज्ञान
३३ विज्ञानाला नवी दृष्टी देणारे
३४ विश्वोत्पत्तीची मूलभूत प्रक्रिया प्रगट करणारे
* ब्रह्मवृत्तिस्फुरणातून विश्वोत्पत्ती
* ब्रह्मवृत्तिस्फुरणाची परिणती
सगुणसाकार भगवद्विग्रह‘अनध्यस्त-विवर्ता’’पर्यंत नेवून पोहोचविणारे



*..................महनीयांनी केलेला गौरव..................*

(७)



३५ ॲटम-थियरीचे खंडन करणारे
३६ डार्विनच्या उत्क्रांतिवादाचे खंडन करणारे
३७ स्पेन्सरच्या संशयवादाचे खंडन करणारे
३८ थियॉसफीचे खंडन करणारे
३९ मायर्सची समीक्षा करणारे
४० जडवादाचे खंडन करणारे
४१ नास्तिकवादाचे खंडन करणारे
४२ नीतिशास्त्रवेत्ते
* परकीय व भारतीय : तुलना करणारे
* बेकनचे खंडन करणारे
४३ कीर्तनकार : १८ आख्यानरचना
४४ लोकगीतकार : तुंबडी,सयनाजी,स्त्रीगीते इ.
४५ लावणीकार : ७७ लावण्या
४६ नाटक लिहिणारे
४७ आत्मचरित्र लिहिणारे
४८ लोक-शिक्षक
४९ स्त्री-शिक्षक
५० बाल-शिक्षक
५१ संस्कृत-मराठी-वऱ्हाडी-हिंदी-व्रजभाषेत लेखन करणारे
५२ अभंग रचना- २१५२

*..................महनीयांनी केलेला गौरव..................*

(८)

५३ पद रचना- २२४४ (राग-ताल-चाल)
* (संस्कृत- ४१पदे)
* (हिंदी- ३०४पदे)
५४ श्लोक- १०००
(संस्कृत / मराठी)
५५ ओव्या- २३०००
५६ गद्यपद्य पत्रे- ११८
(संस्कृत पत्रे- ११)
५७ ग्रंथरचना- १४०
(संस्कृत रचना ३१)
(हिंदी रचना २)
५८ पृष्ठसंख्या- ७०००





*..................महनीयांनी केलेला गौरव..................*

(९)

२



# साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर -

**'खडे तात्विक बोल व सुटी सुभाषिते'**

वऱ्हाडातील सुप्रसिद्ध संतविभूति श्रीगुलाबरावमहाराज यांचा एकएक नवीन ग्रंथ जसजसा प्रसिद्ध होऊन माझ्या पाहण्यात येत आहे, तसतसे त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेबद्दल व साधुत्वाबद्दल माझे कौतुक व माझी आदरबुद्धीही अधिकाधिक वाढतच आहे! हल्ली प्रसिद्ध होणारा त्यांचा ग्रंथ साधुबोध मी पाहिला. त्यांत मुख्यतः प्रश्नोत्तररूपाने धर्म व व्यवहार या दोन्ही विषयांची उत्कृष्ट चर्चा केलेली आहे.

या प्रश्नोत्तरात समर्पकता व मार्मिकता विलक्षण भरली आहे. ती इतकी की, असे प्रश्न विचारणारा व त्यांची उत्तरे देणारा यांना खरोखरच धन्यवाद आहेत.

महाभाारतातील 'यक्षप्रश्नां'ची आठवण हा ग्रंथ वाचून होते. ही प्रश्नोत्तरे भारतातील प्रश्नोत्तरांइतकी चांगली असून शिवाय संख्येने कितीतरी विपुल आहेत.



(१०)

प्रस्तुत ग्रंथातील प्रश्नांनी धर्म व व्यवहार यातील शेकडो कानेकोपरे अशा उत्तम रीतीने धुंडाळले असून, त्यांच्या उत्तरांनीही असा स्वच्छ प्रकाश पाडला आहे की, वाचकाला सुचलेल्या स्वतःच्या शंकांचे निरसन तर होईलच, परंतु आपल्या शंकास्थानासारखी आणखी कितीतरी शंकास्थाने असू शकतात, किंबहुना चिकित्सक बुद्धीला अंत नाही, असे समजून आल्याने मौज वाटते.

''खडे तात्विक बोल व सुटी सुभाषिते, हा उत्कृष्ट ज्ञानप्रद वाङ्मयाचा एक चांगला नमुना व कसोटी आहे.'' श्रीगुलाबरावमहाराज यांच्या ग्रंथात वरील दोन्ही प्रकारचे वाङ्मय बरेच आहे. महाराजांची ग्रंथनिर्मिती मराठीतच असल्यामुळे त्याला महाराष्ट्राच्या बाहेर सर्व देशभर प्रसिद्धी मिळाली नाही.वास्तविक त्यांच्या कांही ग्रंथांची अनेक भाषात भाषांतरे व्हावयास पाहिजे, इतके हे वङ्मय उ□तम आहे.श्रीगुलाबरावमहाराज यांचे काही ग्रंथ जर इंग्रजी भाषेत असते, तर त्यांची किर्ती स्वामी रामतीर्थ किंवा स्वामी विवेकानंद यांच्यासारखी सर्व जगभर परसरली असती.असो.



(११)

श्रीगुलाबरावमहाराज यांचे एकंदर ग्रंथ पाहता तो एक ज्ञानकोश किंवा एनसायक्लोपिडियाच झालेला आहे.

मला असे आश्चर्य वाटते की, या ग्रंथात दिसून येणारी विद्वत्ता त्यांनी कशी व केव्हा संपादन केली ! त्यांच्या बुद्धीची वाखाणणी अधिक करावी की स्मरणशक्तीची ? पण यापैकी एकीच्याने हे कार्य होणारच नाही.फार वर्षांपूर्वी ते मला भेटण्यास आले तेव्हा त्यांच्या संभाषणात त्यांची विद्वत्ता प्रगट झाली. तिचा माझ्या मनावर झालेला परिणाम अद्यापि विसरलो नाही. हा ग्रंथ छापून काढून त्यांच्या भक्तमंडळींनी स्वतःवरचे ऋण तर फेडलेच; पण एकंदर महाराष्ट्रातील वाचकवर्गाला उपकृत करून ठेवले आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाची जुन्या परंपरेने व नव्याही पद्धतीने केलेली अशी चर्चा इतरत्र वाचावयाला मिळणे शक्य नाही.

श्रीगुलाबरावमहाराजांचे ग्रंथ अवश्यमेव संग्रही ठेवून त्यांची अनेक पारायणे करावीत - अशी माझी महाराष्ट्रातील वाचकवर्गाला शिफारस व प्रेमाग्रहाची विनंती आहे.

पुणे.२८-८-१९३५





(१२)



३

# लोकोत्तर उपलब्धी

## अलौकिक श्रेष्ठ पुरुष

## समन्वयमहर्षी

*- माननीय दत्तोपंत ठेंगडी*

*भारतीय मजदूरसंघाचे संस्थापक व माजी खासदार*

जगाच्या इतिहासात असे आढळते की, मानवजातीला उपकृत करणाऱ्या थोर पुरुषांच्या खऱ्या योग्यतेची कल्पना त्यांच्या समकालीनांना येत नाही. त्यांच्या मृत्यूनंतर कालांतराने पुढील पिढ्यांना क्रमाक्रमाने त्यांच्या विचारांची मौलिकता, व्यक्तिमत्तवाचे उत्तुंगत्व व कर्तृत्वाचे असामान्यत्व यांचा अधिकाधिक परिचय होऊ लागतो.अशा श्रेष्ठ व्यक्तीच्या जीवनकार्याला त्यांच्या जिवंतपणी फळ येणेही अशक्य असते, कारण त्यांचे लक्ष्य दूरगामी असते. त्यांनाही याची जाणीव असते.तरीपण आदर्श-प्रेरित होऊन, अंतिम यशाविषयी दृढ विश्वास असल्यामुळे असे महाभाग आपले संपूर्ण जीवन निष्काम बुद्धीने अखंड परिश्रम करण्यात व्यतीत करतात

आणि ईश्वरी न्यायानुसार प्रारंभी उपेक्षित असलेल्या त्यांच्या जीवनकार्याला त्यांच्या अवतार-समाप्तीनंतर समाजाकडून क्रमशः वाढत्या प्रमाणात मान्यता मिळू लागते. अशा अलौकिक श्रेष्ठ पुरुषांत श्रीगुलाबराव महाराज यांची गणना होते.

**<u>महाराजांची अलौकिकता</u>**

श्री ज्ञानेश्वर, शंकराचार्य किंवा ख्रिस्त यांच्याप्रमाणेच श्रीगुलाबराव महाराजांनीही आपला जीवनग्रंथ लवकरच आटोपला. वयाच्या केवळ चौतिसाव्या वर्षी त्यांनी महाप्रयाण केले. ते नऊ महिन्याचे असताना त्यांना कायमचे अंधत्व प्राप्त झाले. बालपणी घरचे किंवा आसमंतातील वातावरण व्यक्तिमत्तवाच्या विकासाला अनुकूल असे नव्हते. या पार्श्वभूमीवर त्यांच्या अत्युत्तम अध्यात्म-साधनेचा व अफाट ज्ञानाजर्नाचा विचार केला की मन आश्चर्याने थक्क होते.

जवळजवळ जन्मांध असलेल्या या गरीब व्यक्तीने पाश्चात्य विज्ञान व विचारप्रवाह, तसेच विभिन्न वैदिक व अवैदिक मतांचे अचूक, मार्मिक व तौलनिक ज्ञान इतक्या लहान वयात कसे प्राप्त करून घेतले असेल !





श्रीमहाराजांनी पाश्चात्यांचेच शब्द वापरून भारतीय नीतिशास्त्र कसे मांडता येते हे दाखवून दिले व युरोपीय आणि भारतीय नीतितत्तवांची तुलना करून भारतीय नीतितत्तवांचे श्रेष्ठत्व सिद्ध केले. शूद्रवर्ण मूळ ब्राह्मणांपैकीच होता. आर्य बाहेरून आले नाहीत, ते भारताचेच मूळ निवासी होते, आर्य शब्द वंशवाचक नसून गुणवाचक आहे. व पूर्वी सर्व विश्वात एकच वैदिक-आर्यसंस्कृती नांदत होती, हे त्यांनी आव्हानपूर्वक सिद्ध केले.

* परक्यांचे अंधानुकरण न करता व राष्ट्राच्या मूलभूत श्रद्धांना धक्का न लावता हिंदूंनी समाजसुधारणा कशी करावी, ह्याविषयी त्यांनी कालोचित मार्गदर्शन केले.

* आर्य-भौतिक शास्त्रांच्या खंडित परंपरेचे पुनरुज्जीवन कोणत्या प्रकारे करावे, हे त्यांनी विशद केले, व

* आधुनिक बुद्धिवाद्यांना आश्वासन दिले की, आपली कल्पना जरी सध्या बाल्यदशेत आहे तरी टिटवीप्रमाणे प्रयत्न केल्यास अशक्य काहीच नाही. *या सर्वांना वैशेषिक शास्त्राची जोड दिली. म्हणजे खरोखरीच मोठे आणि पाश्चात्य भौतिक विज्ञानाला





सर्वथा मूळरूप असलेले स्वयंपूर्ण आर्यभौतिकशास्त्र तयार होईल. आणि ते भौतिकशास्त्र नास्तिक मत खंडन करणारे व 'ईश्वराचे अधिष्ठान असलेले भौतिकशास्त्र' राहील-.

**<u>समन्वय सिद्धान्त</u>**

पाश्चात्य तत्तवज्ञानातील उत्क्रांतिवाद, अणुवाद, संशयवाद आदि सिद्धांत आणि धार्मिक क्षेत्रातील निरनिराळी वैदिक मते, तसेच जैन, बौद्ध, पारसिक, महंमदीय, ख्रिश्चन या सर्वांविषयी त्यांनी अधिकारवाणीने नवीन व मूलगामी विचार प्रकट केले व समकालीन पाश्चात्य विद्वानांच्या प्रमेयांचे समर्थपणे खंडन केले.

सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा, या सहाही दर्शनांवर भरपूर लिखाण करून त्या प्रत्येकांत त्यांनी मौलिक भर टाकली. सांख्य, योग, वेदान्त आणि भक्ती ही सर्व एकमेकांना पूरक आहेत, त्यांत जो विरोध वाटतो तो पातळीचा विरोध आहे, अंतर्गत विरोध नाही. हा अभिनव समन्वयात्मक सिद्धांत त्यांनीच प्रथम प्रतिपादन केला.

तसेच पूर्वमीमांसेतील अनीश्वरवादाने खंडन, वेदांच्या नित्यतेसंबंधी मतांचे आंशिक निराकरण आणि मंत्ररूप देवतावादाचे निरसन करून त्यांनी उत्तरमीमांसेप्रमाणे ईश्वरत्वसिद्धी, देवतांचे





विग्रहस्वरूप आणि वेदांची ईश्वराकडून उत्पत्ती वगैरे सप्रमाण सिद्ध केली. तसेच यज्ञीय हिंसेचे तात्पर्य अहिंसेत आहे, हे विशद केले. अनध्यस्त विवर्त या नवीन शब्दाची निर्मिती करून त्याच्या साहाय्याने शंकरायार्चांच्या अद्वैत सिद्धांतावर भक्तिशास्त्राची मांडणी त्यांनी केली. सगुण-निर्गुण, साकार-निराकार यांतील भेद समाप्त केला. उपासना व भक्तीतील फरक नव्यानेच स्पष्ट केला व भक्तिशास्त्रात नवीन मोलाची भर टाकली. विभिन्न वैदिक संप्रदायात त्यांनी समन्वय स्थापन केला. तसेच वैदिक मतांबरोबर बौद्ध व जैन मतांचा मूळ हिंदू धर्माशी असलेला समन्वय त्यांनी स्पष्ट केला.

ख्रिश्चनमत, बौद्धमत व भागवतधर्म यांचा परस्परसंबंध उलगडून दाखविला व ख्रिस्तीधर्म आर्य ऋषींनीच प्रवर्तित केलेला धर्म आहे, अशी ग्वाही दिली.

राजकीय द्वेषामुळे व व्यावहारिक दुर्गुणांमुळे हिंदू-मुसलमांनाच्या लढाया झाल्यात परंतु धार्मिक द्वेष हिंदु-मुसलमानांत कधीच राहू शकत नाही असे त्यांनी घोषित केले. ते म्हणतात,

'आम्ही त्यांच्या धर्मात ढवळाढवळ करीत नाही - म्हणून त्यांनी आमच्या धर्मात हात घालू नये, असे हिंदूंना वाटते.

हिंदूंच्या धर्मात ढवळाढवळ केली तरी हिंदूंनी उगे रहावे, म्हणजे हिंदुत्व नाहीसे करावे की काय?''

हिंदू-मुसलमानांच्या धर्मतत्तवातील साम्यस्थळे दाखवून ते म्हणतात, ''मुसलमान धर्म उत्पन्न होण्यापूर्वी अरबस्थान, अफगाणिस्थान वगैरे देशांत आर्य धर्मच होता, पण धार्मिक आचारक्रिया सुटल्यामुळे परमेश्वराने पतित लोकांना पुनः परमार्थ मार्गावर आणण्यासाठी मुसलमानी धर्म उत्पन्न केला, असे इतिहासावरून आणि आपल्या पुराणांवरून अनुमान करता येत असल्यामुळे व्यापक अशा हिंदू धर्माशी या मुसलमान धर्माचा सहज समन्वय होतो.''

श्रीगुलाबराव महाराजांच्या या विलक्षण समन्वय-क्षमतेमुळे त्यांना समन्वयमहर्षी ही उपाधी लावणे उचित ठरेल. सद्यःकालीन राजकारणाची धुळवड शांत झाल्यानंतर त्यांच्या या गुणांचा राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला फार मोठा उपयोग होणार आहे, यात शंका नाही.





**समतोल प्रतिपादन**

भारतीय व पाश्चात्य राष्ट्रकल्पनेविषयी ते लिहितात, ''आर्य धर्मातील राष्ट्रकल्पना जगांतील सर्व देशांपेक्षा वरचढ आहे हे म्हणणे अभिमानाचे नाही तर निःपक्षपातीपणाचे आहे. आपल्याकडे जित देशांतील चांगल्या व्यक्तीला होमरूल देण्याची पद्धत होती तर पाश्चात्यांची होमकुंडात घालण्याची पद्धत होती आणि अजूनही आहे.''

त्यांच्या प्रतिपादनांतील समतोलपणा वाखणण्यासारखा आहे. मनुष्यामनुष्यातील जन्माधारित उच्चनीचतेचा निषेध करूनही प्राचीन वर्णाश्रम व्यवस्थेचे शास्त्रीय स्वरूप त्यांनी सिद्ध केले.

धर्माच्या नावाखाली चाललेल्या बुवाबाजीवर कठोर हल्ला करूनही त्यांनी गुरूवरील श्रद्धेला बळकटी आणली.

प्रत्येक मत-संप्रदायातील तर्कविसंगत भागांवर कडक टीका करूनही कुणाचाही बुद्धिभेद किंवा श्रद्धाभंग होणार नाही याची कुशलतेने काळजी घेतली.

आपले जीवनकार्य पार पाडण्याच्या प्रयत्नात या अशिक्षित अंध सत्पुरुषाने मराठी, हिंदी व संस्कृत या भाषांत सव्वाशेच्यावर गद्य-पद्यात्मक ग्रंथांची रचना केली. या साहित्यात,





संगीत, व्याकरण, आयुर्वेद, काव्य, मानसशास्त्र, मानसायुर्वेद आदि विविध विषयांचाही त्यांनी आपल्या मौलिक पद्धतीने परामर्श घेतला आहे. नवीन नावंग भाषेची निर्मिती केली आहे. लघुलिपीची (सांकेतिक लिपीची) निर्मिती केली आहे. १२३ नवीन मात्रावृत्तांची योजना केली आहे. वऱ्हाडी व व्रजभाषेचा उपयोग केला आहे. लोकगीतांची निर्मिती केली आहे. आणि कौटुंबिक समस्या व शिक्षणविषयक प्रश्नांवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या साहित्यसंपदेत २५०० अभंग, १२५० गीते, २३००० ओव्या, २५०० पदे व १००० श्लोक यांचा समावेश होतो. एकूण पृष्ठसंख्या ६००० आहे. हे सर्व ध्यानात घेतल्यास साहित्यसम्राट तात्यासाहेब केळकरांच्या पुढील विधानाची सत्यता पटते. ''महाराजांचे ग्रंथ म्हणजे एक मोठा ज्ञानकोश झाला आहे.''

**असाधारण अधिकार**

परंतु विद्वानांनाही स्तिमित करून सोडणारी विद्वत्ता हे श्रीगुलाबराव महाराजांचे प्रमुख वैशिष्ट्य नव्हते. त्यांच्या श्रेष्ठत्वाचा स्थायी व भक्कम आधार होता आध्यात्मिक क्षेत्रातील त्यांचा असाधारण अधिकार ! मुकुंदराज-ज्ञानेश्वरांपासून रामदास-तुकारामांपर्यंत महाराष्ट्रात अखंड चालत आलेल्या संतपरंपरेचे-





त्यांच्यानंतर जवळजवळ २५० वर्षानंतर श्रीगुलाबराव महाराजांच्या रूपाने पुनरुज्जीवन झाले, असे म्हटल्यास ती अतिशयोक्ती होणार नाही.

गीतेत म्हटले आहे की, शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ विदर्भातील माधानाचे पाटील श्री. गोंदूजी मोहोड व त्यांची धर्मपरायण पत्नी सौ. अलोकाबाई यांचे घराला वरील वर्णन निश्चितपणे लागू पडते. स्वतःच्या आजोळी अमरावतीजवळील लोणी टाकळी या गावी शके १८०३ / इ.स. १८८१ मधील आषाढ शुद्ध दशमीला महाराजांनी सौ. अलोकाबाईंच्या पोटी जन्म घेतला. जन्मतःच त्यांचा ओढा पारमार्थिक गोष्टींकडे होता. अवघ्या नवव्या महिन्यात झालेल्या दृष्टिनाशामुळे, किंवा वयाच्या चवथ्या वर्षी झालेल्या मातृवियोगामुळे, अथवा बाराव्या वर्षी झालेल्या विवाहामुळेही त्यांच्या या मूळ प्रवृत्तीत यत्किंचितही विचलता आली नाही. ईश्वरभक्तीचे वेड जन्मजात असल्यामुळे बाल्यावस्थेपासूनच आपल्या तीव्र स्मरणशक्तीचा व धारणाशक्तीचा उपयोग त्यांनी शास्त्राध्ययन व अध्यात्मचिंतनाकरिता केला. तर्काधिकष्ठित बुद्धिवाद व सूक्ष्मकोमल भावनोत्कटता यांचा मधुर व अभूतपूर्व संगम त्यांचे ठायी असल्याचा प्रत्यय त्या

वयातही निकटस्थांना येत असे. संसारसुखाविषयी पूर्ण विरक्ती व ईप्सितसिद्धीसाठी वाटेल ते परिश्रम घेण्याची सिद्धता या गुणांचाही परिचय या काळापासून होऊ लागला होता. पूर्वसुकृत आणि वर्तमान साधना यांच्या संयोगामुळे १६ वे वर्ष लागण्यापूर्वीच समाधीस्थितीपर्यंत ते आले होते. अध्ययन करण्याकरिता त्यांना विलक्षण कष्ट घ्यावे लागत. दुर्मिळ पुस्तकांचा पाठलाग करणे व इतरांकडून ती वाचून घेणे हे किती जिकिरीचे काम! प्रारंभिक काळात ज्ञानाच्या साधनांच्या शोधात त्यांना सहकुटुंब गावोगावी फिरावे लागले व पुढील काळात स्वमतप्रतिपादनाकरिता हे भ्रमण त्यांना आणखी वाढवावे लागले.

इ. स. १९०१ मध्ये श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांना आपल्या स्वनामाचा मंत्र दिला. त्यानंतर त्यांना ऊहबुद्धी-सिद्धीची स्फूर्ती प्राप्त झाली.

इ. स. १९०३ साली त्यांनी शुक्लेश्वर वाठोडा येथे भागवतातील दशमस्कंधात सांगितलेल्या कात्यायनी देवीच्या मंत्राची दीक्षा घेतली व माधुर्यभक्तीला अनुकूल असा कात्यायनीदेवीचा महोत्सव सुरू केला.





**संप्रदाय उपासना**

इ.स.१९०८ मध्ये त्यांनी शिवदीक्षा घेऊन पार्थिवपूजेस प्रारंभ केला व इतरांनाही शिवाच्या नित्य पार्थिव पूजेचा नियम घालून दिला. यानंतरचा उर्वरित काळ भजन, पूजन, प्रवचन, ग्रंथरचना, स्वमतप्रचार यांतच त्यांनी घालविला. व इ.स.१९१५ च्या भाद्रपद शुद्ध द्वादशीला २० सप्टेंबर १९१५ या दिवशी सूर्योदयाच्या मंगल समयी त्यांनी ब्रह्मस्थानी प्रस्थान केले.

या अल्प कालावधीत त्यांनी स्वतः आध्यात्मिक क्षेत्रांतील अत्यु□पद प्राप्त करून घेतलेच, परंतु त्याचबरोबर अनेक लोकांना या क्षेत्रात मार्गदर्शन केले. अनेक लोकांना स्वतः दीक्षा दिली. सर्व मतसंप्रदायांच्या अनुयायांची त्यांच्या त्यांच्या मतांविषयीची श्रद्धा बळकट केली. प्रत्येक मताला तर्काच्या कसोटीवर घासून त्यांतील ग्राह्याग्राह्य भागाचा निवाडा केला. कुणाचाही किंचितही श्रद्धाभंग होऊ न देता, सर्व संप्रदायांचे महत्तव स्वीकार करूनही त्यांनी शांकराद्वैत व वेदापासून चालत आलेल्या माधुर्यभक्तीचा अधिकार आत्मज्ञानसंपन्न व्यक्तीसाठीच मर्यादित करून संप्रदायातील संभाव्य विकृतींना मुळातच आळा घातला. स्वतः विधिपूर्वक संप्रदायाच्या व्रतनियमांचे पालन करून इतरांना तसे करण्याची प्रेरणा दिली व





संप्रदायाला आधारभूत अशी ग्रंथसंपत्ती निर्माण करून त्याचा भक्कम पाया घातला.

श्री ज्ञानेश्वरमधुराद्वैत संप्रदाय ही महाराजांनी समाजाला दिलेली मोलाची देणगी आहे व ही देणगी सर्व-संप्रदाय समन्वयाच्या अधिकारी द्रष्ट्याने दिलेली आहे, हे विशेष !

उण्यापुऱ्या तीन दशकांचे हे कार्यकारी जीवन किती लोकोत्तर उपलब्धींनी भरलेले आहे. त्याच्या सर्व पैलूंचे समग्र दर्शन घडविणे इथे शक्य नाही व ते अभिप्रेतही नाही. इतके मात्र खरे की, या जीवनाच्या सखोल अध्ययनाने राष्ट्र-धर्म-संस्कृतीच्या अभिमान्यांना एक नवीन प्रेरणा प्राप्त होऊ शकेल. ०००



## ४

## ऋणानुबंध

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे परम पूजनीय गुरुजी गोळवलकर हे आमच्या कुटुंबियांशी अगदी निकटचे ! आमच्या शैशवात त्यांनी आम्हाला अंगाखांद्यावर खेळविलेले. आमच्या घरचे कोणतेही कार्यक्रम गुरुजींशिवाय झाले नाहीत, असे बाबांचे आणि गुरुजींचे स्नेहाचे संबंध! माझ्या प्रबंधाचा आराखडा तयार





झाल्यानंतर काही दिवसांनी योगायोगाने पूजनीय गुरुजी आमचे घरी विश्रांतीला आले असता प्रबंधाचा विषय निघाला. श्री गुलाबराव महाराजांच्या वाङ्मयावर मी लिहिणार आहे असे ऐकून त्यांना आनंद झाला. त्यांनी महाराजांच्या संप्रदायाशी स्वतःची असलेली जवळीक मला सांगितली व म्हणाले -

''मुळे मास्तरांना मी महाराजांचे सर्व ग्रंथ वाचून दाखविलेले आहेत.''

नंतर प्रबंधाचा आराखडा त्यांनी स्वतःहून पाहिला व म्हणाले ''पुढे जे काय तूं लिहिशील ते मला पहावयाचे आहे.''

विद्यार्थी दशेपासून पू. गुरुजींचा महाराजांच्या संप्रदायाशी निकट संबंध होता. श्री गुलबरावमहाराजांचे शिष्य श्री मुळे मास्तर (नागपूरच्या नीलसिटी हायस्कूलचे मुख्याध्यापक) यांचेकडे गुरुजी विद्यार्थी दशेत असताना रहात असत. तसेच महाराजांचे उत्तराधिकारी श्रीबाबाजीमहाराज पंडित यांचेशी गुरुजींचा जवळचा नातेसंबंध होता व गुरुजींच्या मातोश्रींचा - ताईंचा श्रीबाबाजी महाराजांवर गुरुभावही होता. या सर्व ऋणानुबंधामुळे त्यांना माझ्या प्रबंधाविषयी उत्सुकता होती.

गुरुजी - ''महाराजांच्या साहित्यावर लेखन करणे अवघड आहे. पण आता ठरविलेच आहे तर मग मागे पाय घेऊ नकोस.''मला प्रोत्साहन मिळाले. धीर आला. तरी मी एक शंका विचारली.

**<u>समन्वय विचार</u>**

मी- ''महाराजांनी नानाविध विषयांवर विपुल लेखन केले आहे. खंडन करताना कोणाचाही मुलाहिजा ठेवलेला नाही. पण प्रसंगविशेषी खंडन करून पुनः त्याचाच ते समन्वयही करून दाखवितात. तेव्हा याची संगती कशी लावणार?''

गुरुजी हंसले व म्हणाले ''अरे, अभ्यास करणारा तूं ! तूंच संगती लावायला हवी. मला महाराजांचे ग्रंथ वाचून बरेच दिवस झालेत. आता बरोबर आठवतही नाहीत. परंतु एक लक्षात ठेव की महाराजांनी जे काय खंडनमंडन केले ते द्वेषबुद्धीने केलेले नाही. पण तुम्ही संशोधक स्वतःची मते साधुसंतांवर लादून काय काय वाटेल ते लिहिता! असा प्रकार टाळायला हवा.

महाराजांनी एका ठिकाणी एखाद्या व्यक्तीचे खंडन केले आहे तर दुसरीकडे तिची स्तुतीही केली आहे याचा अर्थ त्यांच्या मनात कोणत्याही प्रकारचा आकस नाही, हे निश्चित !





महाराजांना धर्मदृष्टीने किंवा भक्तिदृष्टीने जे चूक वाटले ते त्यांनी खोडून काढले पण चांगल्या गोष्टी त्यांनी स्वीकारणीयही ठरविल्या. त्यांनी भिन्न भिन्न धर्मांचे किंवा मतांचे अद्वैतज्ञानदृष्टीने व परखड युक्तिवादाने खंडन केले पण लोकांमध्ये विनाकारण परस्पर विद्वेष पसरू नये यासाठी त्याचा समन्वयही करून दाखविला. आपली मते समतोलपणाने आणि तौलनिक रीतीने मांडली. स्वतः कुणबी असूनही स्वजातिबांधवांच्या द्वेषमूलक युक्तिवादांची चिकित्सा केली. परस्पर विरोधी असलेल्या दोन्ही बाजू अगदी स्पष्टपणे समाजापुढे मांडल्या आणि भारतीय समाजात जातींचा **''भेद'' नसून ''व्यवस्था''** असल्याचे प्रतिपादन केले. आपल्या समाजातील भिन्न भिन्न घटकांनी परस्पर भांडू नये यासाठी त्यांनी अत्यंत महत्व असलेला ''समन्वयविचार'' मांडला.

**<u>समन्वय विचाराची 'सामाजिक व्याप्ती'</u>**

''हा समन्वयविचार म्हणजे देशातील सामाजिक बंधुभावाला महाराजांनी दिलेले तात्त्विक अधिष्ठान आहे.'' या समन्वयविचाराचे फार दूरगामी परिणाम होण्याजोगे आहेत. मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध वगैरे धर्मसंप्रदायांतील प्रमुख तत्तवे, त्या त्या धर्मापेक्षा ऐतिहासिक दृष्टीने प्राचीन असलेल्या





हिंदुसंस्कृतीत म्हणजे पर्यायाने वैदिक आर्यसंस्कृतीत कशी सापडतात, याचे त्यांनी विवेचन केले. त्यासंबंधी त्यांनी दाखविलेली दिशा महत्वपूर्ण आहे. त्यानुसार प्रबोधन झाले तर केवळ भारतीय समाजच एक होईल असे नसून जगातील सर्व धर्मांचे समाज परस्पर सामंजस्याने राहू शकतील. इतका महाराजांचा समन्वय विचार प्रभावी आहे. तुझ्या प्रबंधात याचा सांगोपांग ऊहोपोह झाला पाहिजे.''

बघता बघता महाराजांच्या समन्वयासूत्राची गुरुजींनी दाखवून दिलेली ही 'सामाजिक व्याप्ती' नेहमीकरताच माझ्या लक्षात राहिली. (इ.स.१९६८)

असा हा क्रम चालू असता एका प्रसंगाने तर मी भारावून गेलो. त्यांच्या मर्मस्पर्शी प्रतिभेचे ते दर्शन त्यांच्या विषयीच्या आदरभावात मला नेहमीच जाग आणीत असते.

भक्तिशास्त्राचे प्रकरण लिहीत असताना महाराजांनी केलेल्या भक्तीच्या सोळा प्रकाराचे वर्णन मी केले. एका संदर्भ श्लोकात नवविध प्रकारच्या भक्तीचे आदर्शभक्त कोण कोण आहेत याचे वर्णन आहे. तो श्लोक सर्वानाच प्रमाण आहे. त्यात





आत्मनिवेदन भक्तीचा आदर्शभक्त म्हणून बलिराजाचे नाव येते. ''देवस्यात्मनिवेदने बलिरभूत् सर्वस्व-संपूजने'' हा तो श्लोक होय.

महाराजांच्या प्रतिपादनाप्रमाणे आत्मनिवेदनाची दोन अंगे - ममतासमर्पण व अहंतासमर्पण. ही द्विविध अंगे बलिराजाच्या जीवनात कशी अनुस्यूत आहेत, निदान प्रस्तुत श्लोकात ती कसे ध्वनित करण्यात आली आहेत हे माझ्या लक्षात आले नव्हते. गुरुजीने ते चटकन ओळखले आणि सर्वस्व या शब्दाची नवी उकल माझे पुढे ठेवली.

गुरुजी- 'सर्व' म्हणजे ममतास्पद सर्व पदार्थ; आणि 'स्व' म्हणजे अहंतास्पद असलेला (देहासह) मी ! बलिराजाने भगवान वामनाला दोन पावलात स्वतःच्या स्वर्गादि सर्व राज्याचा भूमिभाग दान दिला. स्वतःचे काहीही शिल्लक ठेवले नाही. हे ममतासमर्पण झाले. पुढे तिसरे पाऊल स्वतःच्या मस्तकावर ठेवण्यास सांगितले. याचा अर्थ पहिल्या दोन पावलात ममतास्पद सर्व पदार्थ भगवंताला निवेदन करून तिसऱ्या पावलात देहासकट स्वतःचे म्हणजे पूर्ण अहंतेचे समर्पण केले. हे दोन्ही प्रकार मिळून आत्मनिवेदन पूर्ण झाले. त्या दोन्ही भक्तींचा आदर्श बलिराजा असल्याचे त्या श्लोकात स्पष्ट दिसते.''

दुसऱ्या एका प्रसंगी बुवाबाजी प्रकरणात 'इलेस्ट्रेटेड विकली' आणि तत्सम नियतकालिकातून आणि वर्तमानपत्रातून आलेली सचित्र माहिती मी संदर्भासहित लिहून काढली.

गुरुजी - 'हे काय? तुझ्या प्रबंधात बुवाबाजीसंबंधी तात्त्विक चर्चा असणे हे मी समजू शकतो. व्यक्तिगत टीका करणे बरे नाही.'

प्रा. कुळकर्णींनी देखील हा भाग पूर्वीच नाकारला होता व गुरुजींचेही तेच मत पडले. मी तो भाग काढून टाकला.

पूजनीय गुरुजींनी 'श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा' या माझ्या प्रबंधाची सारी प्रकरणे स्वतः वाचून काढली आणि प्रत्येक विषयावर माझेशी चर्चा केली. वेळोवेळी मार्गदर्शन केले. मात्र महाराजांचा इतिहासविषयक दृष्टिकोन मांडताना मला फार अवघड गेले.

आर्यांच्या इतिहासाबद्दलचे संदर्भ इतके प्रचंड प्रमाणात विपुल आहेत की, काय घ्यावे व काय सोडावे, हेच कळत नाही. इतिहासाचे क□ा प्रकरण तयार झाले तेव्हा मार्च १९७३ असावे. गुरुजींची प्रकृती दिवसेंदिवस क्षीण होत होती. बराच वेळ बसणे होत नसे की वाचनही होत नसे. त्या काळात कोणी डॉक्टर वगैरे





आसपास नाहीत असे पाहून मी डॉ. हेडगेवार भवनामध्ये गुरुजींकडे जात असे. श्री कृष्णराव मोहरील मात्र हाताने खुणावून आत जावयास सांगायचे. माझ्यावरचा कृष्णरावांचा लोभ असा व्यक्त होत असे.

एक दिवस ५०-६० पानांचे इतिहासाचे प्रकरण घेऊन गुरुजींकडे गेलो. त्यांना पाहून मनात आले की गुरुजींच्या अशा रुग्णावस्थेत त्यांना 'वाचा' म्हणणे अगदी क्रूरता आहे. आणि त्याबरोबर मनात संकोचही वाटत होता की, आपण गुरुजींच्या उत्तर ध्रुवासंबंधीच्या मताहून वेगळेच नव्हे तर विरुद्ध प्रतिपादन केलेले आहे. हे वाचून त्यांना काय वाटेल? पण मनात हीही खात्री होती की माझे चुकले असेल तर गुरुजी समजावून सांगतील व मला माझे मत दुरुस्त करावे लागेल. पण त्याहीपेक्षा पू. गुरुजींची प्रतिक्रिया पाहण्याची उत्सुकता मला अधिक होती.

गुरुजींच्या नेहमीच्या हंसतमुख उल्लसित वृत्तीमुळे भीड चेपली गेली. गुरुजींनीच चौकशी केली आणि मी त्यांना सारे कागद दिले. या रुग्ण अवस्थेत वाचण्यासाठी २-३ दिवस सहज लागतील असे वाटल्याने ३-४ दिवसांनी त्यांचेकडे जाण्याचे मी





ठरविले. पण दुसरेच दिवशी कृष्णराव मोहरीलांचा फोन आला.

''भैय्या तूं अजून आला कसा नाहीस? गुरुजी तुझी आठवण करीत आहेत.'' मी ताबडतोब कार्यालयात गेलो. दुपारचे साडेतीन-चार वाजले होते. भीतभीतच खोलीत प्रवेश केला. गुरुजी स्वस्थ बसले होते. त्यांनी एकदम विचारले-

गुरुजी - 'अरे, सकाळपासून तुझी वाट पहात होतो.'

मी - ''आपली तब्येत बरी नाही. वाचायला दोन दिवस सहज लागतील असे वाटले म्हणून उद्या येणार होतो.''

गुरुजी - ''अरे, मी तर केव्हाच वाचले. चांगला अडीच तास बसलो होतो. एका दमात वाचून काढले.''

मनात आले की अशी क्षीण प्रकृती असताना आपण गुरुजींना उगाचंच त्रास दिला.

गुरुजी - ''हा विषय महत्वाचा आहे. मांडणी चांगल्या रीतीने झाली पाहिजे. समतोलपणा नसेल तर लोक मुळीच लक्ष देणार नाहीत.''

मी - ''गुरुजी, एक विचारावयाचे आहे. मी तुमच्या मताहून वेगळे मत मांडले आहे. उत्तर ध्रुव पूर्वी ओरिसात होता हे मत मला बरोबर वाटत नाही. तसे मानले तर लो. टिळकांचे मत





बहुतांश खरे मानल्यासारखे होईल. आपल्या प्राचीन ग्रंथांतील पुराव्यांबद्दल अनास्था दाखवावी लागेल. 'पूर्वी आर्य लोक उत्तर ध्रुवाचरच रहात होते, त्यावेळी इतरत्र आर्यांची वसती नव्हती, आर्य शब्द वंशवाचक आहे' - वगैरे एकांगी निष्कर्ष काढण्यास वाव मिळेल. जगातील भिन्न भिन्न ठिकाणच्या उत्खननातील पुराव्यांतून सर्व जगात आर्यसंस्कृतीचे प्राचीन अवशेष आजही सांपडत आहेत. त्यांना बाध येईल असे मला वाटते.''

गुरुजी - ''अरे, लो. टिळकांच्या म्हणण्याप्रमाणे उत्तर ध्रुव आजच्याच ठिकाणावर असला काय किंवा ओरिसा बिहारात असला काय, फारसा फरक पडत नाही.

महाराजांचा सिद्धांत या दोन्ही मतांपेक्षा व्यापक आहे. आणि निश्चितपणे सत्याला अधिक जवळचा आहे. उत्तर ध्रुवप्रदेशात आर्य होते तेव्हा साऱ्या जगातही आर्य होतेच. हीच आर्यांची विश्वव्यापक संस्कृती नव्हे काय?

तसेच ''आर्य हा वंश आहे'' ही कल्पना तर पाश्चात्य पंडितांनीही आतां चुकीची ठरविली आहे.

एकूण काय तर महाराजांच्या सिद्धांताने आर्यांचा उत्तर ध्रुवीय निवास वगैरे मते सपशेल चूक ठरत नाहीत तर एकांगी

ठरतात. बरे असो. या विषयावर नवी संशोधन पुष्कळ झाले आहे. त्यांचाही संदर्भ या प्रकरणात घेता आला तर पहा.''

त्यांनी जुन्या पुस्तकांची नावे आठवण्याचा बराच प्रयत्न केला व शेवटी म्हणाले- ''आता आठवणही दगा देत चालली.... उद्या परवा तूं ये. पुस्तकांची नावे आठवली तर सांगेन. या प्रकरणात तूं महाराजांच्या 'समयोपदेश' या पुस्तकातील बरेच उद्धृत केले आहेस. हा ग्रंथ नवा दिसतो. माझ्या वाचनात आलेला नाही. त्यातील महाराजांच्या विवेचनाचा चांगला अभ्यास करून नवीन पुराव्यांच्या आधाराने हा विषय समर्थपणे मांडला गेला पाहिजे. ''अभयं सत्वशुद्धिः'' हे (गीतावचन) लक्षात ठेव. कोणाचेही भय बाळगण्याचे कारण नाही.

इतिहासाच्या अध्ययनाची दिशा महाराजांनी दाखवून दिली आहे. त्याच्या अनुरोधाने खूप ''लिहिता येण्याजोगे'' आणि ''करता येण्याजोगे'' आहे.

आमचे तर संपले ... !

आतां तुम्ही करा !

अतिरेक न करता सत्याची बाजू व्यवस्थित मांडली की लोकांचा विरोध आपोआप कमी होईल. लोकांना फारसे न





दुखवतां आपले विचार मांडावे. तूं हा विषय हाती घेतला आहेस तर आता मागे हटूं नकोस.''

असे बोलत असता गुरुजींनी माझ्या पाठीवर थाप मारली व म्हणाले- **''डरो मत आगे बढो !''**

माझ्या प्रबंधासंबंधीचे गुरुजींचे हे अखेरचे शब्द! त्यानंतर मात्र त्यांची प्रकृती अधिकाअधिक खालावतच गेली. काव्यशास्त्र आणि पहिले प्रकरण त्यांना दाखविण्याचे राहून गेले.

देह असा कर्करोगाने जर्जर झालेला, पैल तीरावर नजर स्थिर झालेली, पण गुरुजींच्या मुखावरील स्मित कधी मावळलेले दिसले नाही. तीव्र स्मरणशक्ती असलेले गुरुजींचे शतावधानी व्यक्तिमत्व कोणीकडे आणि मजसारखा अपरिप्व बुद्धीचा सामान्य विद्यार्थी कोणीकडे!

मी त्यांच्या पुस्तकावर आक्षेप घेतले पण त्यांना त्याचा राग आला नाही. उलट मी मांडलेले महाराजांचे सनातन सिद्धान्तच त्यांनी उचलून धरले. अतिशय प्रेमाने आणि अगदी सहजतेने मला प्रोत्साहित केले. स्वतःकडे कमीपणा घेण्यातही त्यांना संकोच वाटला नाही.

हा मनाचा मोठेपणा मला जवळून पाहता आला- नव्हे अनुभवता आला. हे माझं केवढं भाग्य! ''लघुत्वाचेनि मुद्दले,





बैसला गुरुत्वाचे सेले'' असे उत्तुंग व्यक्तिमत्व पुनः दिसणे नाही आणि पाठीवर थाप पडणे- तेही नाही !

फक्त त्यांचे निरंतर स्फूर्ती देणारे अखेरचे ''डरो मत, आगे बढो. - डरो मत आगे बढो.'' हे शब्द आठवतात आणि पूजनीय गुरुजींच्या आठवणी दाटून येतात. -- ***कृ.मा.घटाटे***

*मार्च १९७३*



**श्री.बाबासाहेब घटाटे आणि**

**परम पूजनीय श्री. गुरुजी गोळवलकर**

*मार्च १९७३*





## जन्मशताब्दीचा वृत्तांत

*नवी दिल्ली, २० सप्टेंबर १९७८*

विश्व संत साहित्य प्रतिष्ठानच्या विद्यमाने मधुराद्वैताचार्य प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज यांच्या जन्मशताब्दी समारोहाचे उद्घाटन डॉ.अ.स.जोशी यांच्या पुढाकाराने राजधानी दिल्ली येथे २० सप्टेंबर १९७८ रोजी श्री. पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांचे हस्ते एका साध्या पण आकर्षक समारंभात पार पडले. पंतप्रधानांच्या निवासस्थानीच मंडप घालून समारंभ झाला. याचवेळी डॉ. कृ. मा. घटाटे यांनी लिहिलेल्या ''श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा'' या पीएच्.डी. प्राप्त प्रबंधाचे प्रकाशन पंतप्रधानांनी केले. अध्यक्षपद प्रज्ञाभारती श्रीधर भास्कर वर्णेकरांनी भूषविले.

* सुरवातीला पंतप्रधानांनी श्रीमहाराजांना हार घातला.
* प्रा. डॉ. म. रा. जोशींनी पंतप्रधानांचे स्वागत केले.
* प्रा.डॉ.रूपा कुळकर्णी यांनी श्रीमहाराजांची पदे गायिली.
* संतन के पग लाग । मानस ।। (हिंदी पद )
* आंधळे लोचन पांगुळे चरण ।। ( मराठी पद)

त्यातील निवेदन प्रा. सुरेश देशपांडे यांनी केले.

* श्रीगुलाबराव महाराजांचे नातू श्री बाळासाहेब मोहोड यांनी पंतप्रधानांना श्रीमहाराजांचे सर्व ग्रंथ भेट दिले.

* पंतप्रधानांनी श्री बाळासाहेब मोहोड यांना गणेशमूर्ती दिली.

* सौ.लक्ष्मी घटाटे यांनी प्रबंध ग्रंथाबद्दल माहिती सांगितली.

* नंतर पंतप्रधान मोरारजीभाईचे भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आणि संतांनी केलेल्या कार्याचे महत्व प्रतिपादन करणारे सुरेख भाषण झाले.शेवटी प्राचार्य डॉ.अ.स.जोशींनी आभार मानले.

ooo

*(या समारंभाला श्री बाबासाहेब घटाटे, सौ.ताराबाई घटाटे, भारताचे परराष्ट्रमंत्री श्री अटलबिहारी बाजपेयी, दिल्लीचे मेयर श्री लाला हंसराज गुप्त, श्री जगन्नाथराव जोशी, न्यायमूर्ती आपटे, न्यायमूर्ती श्री प्रकाशदत्त भार्गव, खासदार श्री नानासाहेब बोंडे, श्रीमती सिंधुताई फाटक, खासदार श्री बाबासाहेब धारपकर, प्रा. श्री. मा. कुलकर्णी, श्री भाऊ घुई, मातोश्री ताई अमरावती, तसेच विश्वसंत साहित्य प्रतिष्ठानातर्फे श्री बाबुराव घुई, श्री नारायणराव आठवले, डॉ. नानासाहेब पिंपळापुरे, प्रा. मनोहर इंदापवार, डॉ.राम पंडित ही मंडळी आणि मीरजेचे  नवीनचंद्र मराठे, पुण्याचे डॉ. प्रकाश पारखे, बेळगांवचे श्री आनंद सराफ, औरंगाबादचे श्री दादासाहेब चौधरी वगैरे मंडळी उपस्थित होती.)* .............





**<u>उपक्रमाची पार्श्वभूमी १९८१</u>**

श्रीगुलाबराव महाराजांचे विचारधन भारतातल्याच नव्हे तर सर्व जगातील अभ्यासकांपुढे येणे अगत्याचे आहे असे वाटत असल्यामुळे प्रज्ञाभारती श्रीधर भास्कर वर्णेकरांच्या अध्यक्षतेखाली महाराजांची जन्मशताब्दी साजरी करण्याचे ठरविले गेले. त्यानुसार प्रथमतः प्राचार्य डॉ. अरविंद जोशी यांनी पुढाकार घेऊन, दिल्लीला २० सप्टेंबर १९७८ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री मोरारजी भाई देसाई यांचे हस्ते, पंतप्रधानांच्या निवासस्थानी महोत्सवाला प्रारंभ झाला.

त्यानंतर नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु श्री. काळमेघ यांनी जन्मशताब्दी समिती स्थापन केली. निबंधस्पर्धा आयोजित केली आणि निरनिराळ्या विद्वानांची पाच पुस्तके नागपूर विद्यापीठातर्फे प्रकाशित केली. तसेच मराठी, संस्कृत व हिंदी अभ्यासक्रमात महाराजांच्या पद्य, गद्य, लेख वगैरेंचा अन्तर्भाव केला.

* पुणे विद्यापीठात संगीतावर डॉ.बारलिंगे यांनी चर्चासत्र घेतले

* मुंबई आकाशवाणीचे संगीत दिग्दर्शक श्री यशवंत देव व शोभा जोशी यांनी 'आंधळी गौळण' नांवाचा गायनाचा कार्यक्रम





बसविला व अनेक शहरात त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.

* जन्मशताब्दीच्या निमित्ताने पुरुषार्थ, सिंहवाणी, देवकीनंदनगोपाला, पंढरीसंदेश, धनुर्धारी, प्रसाद, लोकराज्य, तरुणभारत, हिंदु विश्व वगैरे अनेक नियतकालिकांनी व वृत्तपत्रांनी विशेषांक काढून आणि विशेष लेख देऊन महाराजांचे! कार्य लोकांसमोर आणले.

* इंडियन नॅशनल थिएटर या संस्थेचे श्री अशोकजी परांजपे यांनी आयोजित केलेल्या पंढरपूर येथील भक्तिमहोत्सवात आणि मुंबईला मराठा-मंदिरात प्रा. रूपा कुलकर्णी यांनी महाराजांनी रचलेली अस्सल वऱ्हाडी भाषेतील लोकगीते प्रात्यक्षिकांसह प्रस्तुत केलीत व त्याला संगीततज्ज्ञांचा आणि भाविकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. यावेळी सुधाकरराव फणसळकर, वसंतराव चिपळूणकर, व डॉ.कोपर्डेकर यांच्या सहभागामुळे पुण्यातील कार्यक्रम यशस्वी झालेत.

* बंगलोरच्या ''भारत भारती'' संस्थेने प्रा. डॉ. लीना रस्तोगी, सौ. सुनीति आफळे व डॉ. शरद कोपर्डेकर यांनी हिंदी, मराठी व इंग्रजीत महाराजांची बालांसाठी लिहिलेली चरित्रे प्रकाशित केलीत.

* प्रा. मनोहर इंदापवार यांनी अतिशय कष्ट घेऊन २८ चित्रांची चित्रप्रदर्शनी तयार केली.

* नागपुर आकाशवाणी, मुंबई आकाशवाणी, विविध भारती,





दूरदर्शन वगैरेंनी आपापल्या परीने महाराजांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाला सहकार्य दिले. त्याचप्रमाणे नागपूर, अमरावती, माधान, वर्धा, यवतमाळ, उमरेड, अकोला, पुणे, नाशिक, मुंबई, इंदूर, पंढरपूर वगैरे अनेक ठिकाणी तेथील नागरिकांनी पुढाकार घेऊन व्याख्यानमाला, चित्रप्रदर्शनी, गायनाचे कार्यक्रम वगैरे आयोजित केले.

* नागपूर शहरात रामनगरातील राममंदिर, गोरक्षण मंदिर, बुटीचे महादेव मंदिर, अयाचित मंदिर गीतामंदिर वगैरे ठिकाणी व्याख्यानमाला, संगीत सप्ताह, कीर्तन प्रवचनांचे वारकरी पद्धतीचे सप्ताह वगैरे मोठ्या प्रमाणात साजरे झाले. याप्रमाणे सर्व थरातील नागरिकांनी आपापल्या परीने श्रीगुलाबराव महाराजांना सक्रिय आदरांजली वाहिली.

* वारकरी संप्रदायाचे पूज्य धुंडामहाराज देगलूरकर, पू. किसनमहाराज साखरे, विद्यावाचस्पती विष्णुजी क्षीरसागर, पू. विनायकशास्त्री टोळ, ह.भ.प.भाऊसाहेब आळंदीकर, ह. भ. प. मगरबुवा, ह.भ.प.जगन्नाथ बुवा पवार, पू. शिरोळे शास्त्री, वगैरे अनेक वारकरी मंडळी आणि मुंबईचे आदरणीय पांडुरंगशास्त्री आठवले, पुण्याचे आदरणीय अनंतशास्त्री आठवले त्रिबिकेश्वरचे

मुळेशास्त्री वगैरे सर्व थोर लोकांनी आणि अनेक मंडळींनी सक्रिय प्रोत्साहन देऊन हा जन्मशताब्दीचा सोहळा पूर्णत्वाला नेला.

**सहभाग-**

*माननीय मोरोपंत पिंगळे, नभोवाणी मंत्री श्री वसंतराव साठे, पुण्याचे उद्योगपती श्री बाबुरावजी पारखे, टिळक स्मारक मंदिराचे श्री जयंतराव टिळक, महा.साहित्य संस्कृति मंडळाचे डॉ. सुरेंद्र बारलिंगे, प्रा. अरविंद मंग्रुळकर, भारतीय विद्याभवनाचे श्री रामचंद्रन व श्री तोलाठ, श्रीमती पूर्णिमाबेन पक्वासा, लोकसत्तेचे श्री विद्याधर गोखले, तरुण भारतचे श्री बाबुराव मा.गो. वैद्य, बैद्यनाथ आयुर्वेद भवनाचे श्री सुरेश शर्मा, विविध भारतीच्या सौ. मधुवंती मिराशी, नागपूर आकाशवाणीचे श्री सुब्रमणी, श्री पटवर्धन, श्री वसंतराव अंधारे, श्री अडावतकर, सौ. पुष्पाताई काणे, दूरदर्शनचे श्री आकाशानंद देशपांडे, श्री अविनाश पाठक, सौ. कुसुमताई चाफळे, सौ. कल्याणी देशमुख, श्री शरद सुतवणे, श्री. मंग्रुळकर, महाराजांच्या अभंगांना सुरेख चाली देणारे श्री सामक, नागपुर विद्यापीठाचे डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, डॉ. भा. रा. आष्टीकर, प्राचार्य वि. गं कावळे, डॉ. व्ही. व्ही. कुलकर्णी, यवतमाळचे श्री नानाभाऊ एंबडवार, श्री भय्यासाहेब तत्तववादी, श्री बाळ वैद्य, अमरावतीचे श्री भय्यासाहेब देशमुख, फोटोग्राफर रामभाऊ पांडे, माधानची मोहोड मंडळी, वर्ध्याचे डॉ. खापरे, सौ. सुनीति कावळे, पंढरपूरचे पूज्य श्री धुंडामहाराज व श्री भानुदास महाराज देगलूरकर व डॉ. गोपाळराव बेणारे, श्री सुभाष देसाई कोल्हापूर, पुण्याचे डॉ. हेमंत इनामदार, डॉ. ज. वा. जोशी, सौ. जोगळेकर, श्री चंद्रहास जोशी वाई, प्रा. कल्याणी इनामदार मिरज, श्री जयंतराव चौधरी औरंगाबाद, डॉ. प्रेमलता शर्मा वाराणसी, डॉ.वा.के.लेले वाराणसी, अकोल्याचे श्री दादासाहेब पोफळी, दिल्लीचे श्री प्रभाकरराव पाठक व श्री सुरेश कुलकर्णी, पं. गुर्जलवार, कै. आ.रा.देशपांडे, श्रीरामपंत सावरकर, श्री वसंतराव पाठक, श्री रंगनाथजी, श्री गोविंदराव पुराणिक, श्री अयाचित, श्रीमती ताराबाई बुटी, श्री शंकरराव पाध्ये, श्री चंद्रकांत व विवेक तापस, चंद्रकांत कस्तुरे, चित्रकार श्री काकडे व संजय धोतरकर, श्रीराम जोशी, आणि श्री लक्ष्मण नागपुरे या सर्वांनी मनापासून बहुमोल सहकार्य केले. .*

....................................





## ६



श्रीगुलाबरावमहाराजांची विचारसंपदा : विमोचन

## प्रधानमंत्री श्री मोरारजीभाईं देसाई

'घराघरात श्रीमहाराजांचे विचार पोचवावे'

संत श्रीगुलाबरावमहाराज यांचा माझा परिचय नव्हता. कारण मी महाराष्ट्रात होतो तेव्हा अमरावती महाराष्ट्रात नव्हती. त्यामुळे मला जेव्हा या कार्यक्रमासंबंधी सांगण्यात आले तेव्हा महाराजांच्या जीवनासंबंधी माहिती मिळविण्याचा मी प्रयत्न केला व जी काही माहिती मला मिळाली आणि त्यांच्या जीवनाचे जे पैलू मला समजले ते पाहून मला अतिशय आनंद झाला.

### आपला आगळा देश

माझ्या दृष्टीने आपला देश हो जगातील एक आगळाच देश आहे. जगाच्या इतिहासात अनेक संस्कृती होऊन गेल्या. त्या प्राचीन संस्कृतीपैकीच आपलीही एक प्राचीन संस्कृती आहे. हिच्यापूर्वी जगात आणखी कोणती संस्कृती होती किंवा नाही कुणास ठाऊक! परंतु हिच्यानंतरच्याही अनेक संस्कृती नष्ट झाल्या आहेत. उदा- सुमेरियन, बॅबिलोनियन, इजिप्शियन आणि





अखेरीस ग्रीक व रोमन वगैरे अनेक संस्कृती होत्या आणि त्या साऱ्या नष्ट झाल्या. त्या त्या देशातील लोकजीवनात आज त्यांचा मागमूसही दिसत नाही. केवळ पुरातत्त्व शास्त्राच्या अभ्यासकांच्याच त्या शोधविषय आहेत. परंतु भारत हाच एक असा देश आहे की, प्राचीन असूनही हजारो वर्षापूर्वीची जीवनप्रणाली आजही येथे कायम आहे. पण आज आपण दुर्बल झालो आहोत; आपल्या पापांमुळेच आपली अशी दयनीय स्थिती झाली आहे.

परंतु आपल्या संस्कृतीत इतके चैतन्य आहे की, ती पुनःपुन्हा या देशाला वर उचलते आणि गौरव प्राप्त करून देते. पण नंतर उदयाबरोबर अस्तही येतो. परंतु हिचा संपूर्ण अस्त कधीच होत नाही. ही सूर्याप्रमाणे आहे, अस्तानंतर पुनः उदय पावते. फक्त याच देशाचे हे वैशिष्ट्य आणि भाग्य आहे.

### धर्म : मानवतेचा आधार

याचे कारण केवळ एकच आहे. माझ्या समजुतीप्रमाणे याला केवळ देशाभिमान कारणीभूत नाही. सर्व धर्मांविषयी माझ्या मनात समान आदर असल्याने मला असे वाटते की, सर्व धर्मांना आधारभूत असलेली गोष्ट एकच आहे व तिच्यामुळेच मानवता निर्माण होते. कोणत्याही धर्माच्या मूळ स्वरूपात फरक नाही. भिन्न





भिन्न देशातील भिन्न भिन्न संस्कृतींमुळे संस्कारांचे स्वरूप वेगवेगळे असते व त्यामुळे धर्मही वेगवेगळे भासतात.'परंतु मुख्य धर्मक्षेत्र भारतच आहे' असे मी मानतो. कारण येथील धर्माचा प्रभाव जगातील प्रत्येक ठिकाणी पडलेला आहे, कोणताही भाग सुटलेला नाही.

*बहुतेकांनी आता मान्यता दिली आहे की, येशू ख्रिस्त काशीमध्ये राहिले, जगन्नाथपुरीपर्यंत गेले आणि नंतर ते धर्मस्थापक असे 'येशू ख्रिस्त' झाले.

*त्या आधी सूफी पंथियांवरही येथील धर्माची छाया आहे.

*ग्रीकांवरही त्याचा परिणाम झाला आहे.

*'पंचतंत्र' तसे फार जुने नाही, पण पंचतंत्राच्या आधारावर इतर देशांमध्ये ज्या कथा निर्माण झाल्या त्याचा प्रभाव तेथील लोकजीवनावर पडला आहे. येथे 'अरेबियन नाईटस्'चे उदाहरण याकरिता देता येईल.

पण दुर्दैवाने आज आपल्यातच असे काही विचित्र परिवर्तन झाले आहे की, आपल्यालाच या आपल्या देशाचा गौरव वाटत नाही. आजची शिक्षणप्रणालीही त्याला कारणीभूत आहे. परंतु अशा स्थितीतही या देशाला शक्ती प्रदान करणारी एक गोष्ट आहे आणि ती म्हणजे आपली संतपरंपरा !

(४५)

## संतांची भूमी

प्रत्येक देशात संत झाले आहेत. केवळ भारतातच ते होतात, असे नाही. मानवी समाज प्रत्येक ठिकाणी आहे. आपण तर असे म्हणतो की पक्षी असलेले काकभूशुंडीही संत होते. कावळासुद्धा संत असू शकतो, असा याचा अर्थ आहे. असे केवळ भारतातच मानले जाते, इतर कुठेही नाही. इथे जितके संत झाले तितकी बेरीज जगातल्या सर्व संतांचीही होणार नाही. आजच्या काळातही संतपुरुष निर्माण होतच आहेत. त्यात काही ढोंगीही असतात पण त्याला नाईलाज आहे. जिथे स्वच्छता असते तिथे थोडाबहुत कचराही होणारच! कचरा नसेल तर स्वच्छतेची किंमत कशी कळणार!

असो. संतांची परंपरा भारतातच कायम आहे. त्यांनीच आपल्या समाजाला काही महत्वाच्या अधिष्ठानावर कायम ठेवले आहे. आजही आपण बघाल, की गीतेसारखा ग्रंथ साऱ्या जगात कुठेही नाही. आपले लोक समजतात की इंग्रजांनीच आपल्याला शिक्षण दिले. लोकतंत्रही त्यांनीच शिकविले. परंतु ऋग्वेदात लोकतंत्राचे वर्णन आले आहे त्याचे काय !



(४६)

## आध्यात्मिकतेचा अर्थ

असो. संतपरंपरेच्या दृष्टीने पाहिले तर महाराष्ट्रात इतके संत झाले की, महाराष्ट्र ही संतभूमी म्हणूनच मान्यता पावली आहे. आजही ती संतपरंपरा सुरूच आहे. संतांचे कार्य सुरू असले तरी आपणही आपल्याकडून होईल तितके चांगले करीत असावे. ईश्वर तर आपल्याला मदत करीतच असतो. तोच आपल्याला शक्ती देतो. म्हणूनच या देशाची अशी शिकवण आहे की-- ''सुख आणि दुःख या केवळ मनाच्या मानीव गोष्टी आहेत. कोणत्याही परिस्थितीत आपण सुखी राहू शकतो आणि कोणत्याही परिस्थितीत दुःखीही राहूं शकतो.'' आणि शास्त्रात असेही सांगितले आहे की, ''भौतिक साधनांचा मोह वाढला की, खऱ्या सुखाला तिलांजली द्यावी लागते.'' म्हणून या देशात त्यागाचा जेवढा महिमा आहे, तेवढा जगात कुठेही नाही. येथे कोणीही त्यागी असला की त्याला लोकांची मान्यता मिळते. म्हणून प्रत्येक साधू जिथे असले तिथे लोक त्याचे अनुसरण करतात. साधूंना धनसंचय करण्याची हांव नसावी.

जीवनात भौतिक गोष्टींची आवश्यकता असते. सामान्य जनांनी त्यापासून अलिप्त असावे, हे म्हणणे व्यर्थ आहे. परंतु



(४७)

पूर्णपणे त्यातच बुडून जाणे हे मात्र योग्य नाही. म्हणून भौतिक गोष्ट विसरून जाण्यावर संतांनी विशेष भर दिला. त्यांचा हा प्रयत्नच आपणाला भौतिकतेत संपूर्ण बुडून जाण्यापासून वाचवितो. ''भारतीयांनी केवळ अध्यात्माकडेच लक्ष दिले त्यामुळे या देशाचे पतन झाले,'' या म्हणण्यात तथ्य नाही. पश्चिमी देशांमध्ये फक्त भौतिकतेकडेच लक्ष आहे. परिणामतः तेथे किती दुःख आहे, हे लक्षात येणेही कठीण आहे. शिवाय त्यांच्यापुढे एक मोठे संकट आहे की, ''यापुढे काय होणार?'' ते भारताकडे आशेने पाहतात आणि आपण मात्र त्यांच्याकडे डोळे लावतो. या विषयासंबंधी संतांच्या जीवनापासून आपल्याला बरेच काही मिळाले आहे.

घराघरात महाराजांचे विचार पोचवावे

संत श्रीगुलाबराव महाराज जन्मांध होते, अल्पायू होते; तरी त्यांनी किती मोठे कार्य केले! त्यांची उपलब्ध ग्रंथसंख्याच १३० सांगितली जाते. माझ्या जीवनात कदाचितच एवढे ग्रंथ मी वाचूं शकेन !

मला आनंद वाटतो की, आपण प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराज यांची जन्मशताब्दी साजरी करणार आहात. तीन वर्षेपर्यंत आपण ती पाळणार हीही चांगली गोष्ट आहे. परंतु



(४८)

हा केवळ कागदी घोडा राहणार नाही अशी मी आशा करतो. त्यांचे विचार घराघरांत पोहोचविण्याचा आपण प्रयत्न करावा; तरच शताब्दी साजरी करणे सार्थ ठरेल. सर्वदूर महाराजांचे विचार आपण पसरवू शकता. याचा अर्थ असा नव्हे की, भारतातील एकूण एक घरात ते पोहोचवा. परंतु आपण जिथे आहात तिथे तरी त्या विचारांचा प्रसार होईल अशी मी आशा करतो. योग्य ठिकाणी त्यांचे विचार पोहोचले तर सर्वदूर पोहोचतील. दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत, पश्चिमेकडून पूर्वेपर्यंत!

पूर्वीचे आपले संत देशातील सर्व ठिकाणी गेले आहेत. शंकराचार्य दक्षिणेचे असून ते पोहोचले काश्मीरला, पुरीला अन् द्वारकेला! आपले एकूणएक संत यात्रेच्या निमित्ताने सर्व देशभर फिरले आहेत. त्यामुळेच या देशात संस्कृतीची एकता दिसत आहे. त्यांच्यामुळेच हा विशाल देश 'भा-रत' म्हणविला जातो, 'सर्व मिळून एकच देश' म्हणविला जातो. पण येथे कधीही एक राज्य नव्हते. या देशाच्या इतिहासात पाहिले तर येथे वेगवेगळी राज्ये होती. आताच पहिल्याने आपला भारत एक मोठे राज्य झाले आहे.

त्यामुळे पूर्वी आपल्याकडे देशाभिमानाचा अभावच राहिला. एक भाषा निर्माण झाली नाही. असे असूनही हा संपूर्ण

देश मात्र एकच मानला गेला. युरोपच्या तुलनेत पहा- जितक्या भाषा तिकडे आहेत त्याहून अधिक एकट्या भारतात आहेत. परंतु युरोपला कोणी एक देश मानीत नाही. वास्तविक पाहता तेथे धर्म एकच आहे. उलट हिंदुस्थानात धर्मसंप्रदाय अनेक आहेत. आणि इथे बाहेरून जे जे आले त्या सर्वांना येथे आश्रय मिळाला, स्थान मिळाले. उलट आक्रमकांनी- इंग्रजांनी येथे अडचणी निर्माण करून लढाई-झगडे सुरू केले. आपणही असे मूर्ख की, आपसात भांडायला लागलो. परंतु आता आपल्याला समज येऊ लागली आहे. माझा असा विश्वास आहे की धैर्याने कार्य केले तर आपल्या देशाला पुन्हा तोच पूर्वीचा गौरव प्राप्त होईल. आपली पुन्हा प्रगती होईल. परंतु केवळ आपल्याकरिताच ती असणार नाही, उलट सर्व मानवी समाजाला पुढे घेऊन जाण्यासाठी आपली प्रगती राहील. हेच महत्त्वाचे आहे.

### भारताची परंपरा

परंतु आपण स्वतः आपल्याला घडविले तर इतर जग आपले अनुकरण करील. तलवारीच्या सहाय्याने आपल्या पूर्वजांनी आपला सत्वसंपन्नतेचा संदेश कधीच बाहेर पोहोचविलेला नाही, आपल्या संतांनीच तो सर्व जगात पोहोचविला. हीच इथली परंपरा





आहे. ही संतपरंपरा इथे कायम राहील, असा मला विश्वास आहे आणि जर यावर आपलीही श्रद्धा असेल तर ती आपल्या प्रत्यक्ष जीवनात उतरली पाहिजे. केवळ बोलण्यांत नव्हे. ज्याला जितके जमेल तितके करून त्याने पुढे जावे. रोज याचे स्मरण ठेवावे. जे चांगले वाटेल ते कार्य करावे- पण धर्म सोडून करू नये. एवढे जरी आपल्या जीवनात उतरले तरी या देशाला कोणतीही गोष्ट कठीण नाही, असे मी मानतो.

प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांच्या जन्मशताब्दी समारोहाने हेच वातावरण या देशात दृढ व्हावे, अशी मी आशा करतो. याच आशेने डॉ.कृष्ण माधव घटाटे, यांच्या 'श्रीगुलाबराव महाराजांची विचारसंपदा' या शोधप्रबंधाचे मी प्रकाशन करीत आहे.

*--पंतप्रधानांचे निवासस्थान, नवी दिल्ली २० सप्टेंबर १९७८*


*(या प्रसंगी त्यावेळचे विदेशमंत्री, नंतर पंतप्रधान झालेले सन्माननीय अटलबिहारी वाजपेयी, दिल्लीचे महापौर श्री हंसराजजी गुप्ता, नागपूरचे श्री बाबासाहेब घटाटे, प्रज्ञाभारती श्री.वर्णेकर व श्रीगुलाबरावमहाराजांचे नातू बाळासाहेब मोहोड इ. अगत्याने उपस्थित होते.*

..................





७



**भूतपूर्व प्रधानमंत्री**

## अटलबिहारीजी वाजपेयी

*श्रीगुलाबरावमहाराज के जीवनी' का विमोचन*

*गुरुपौर्णिमा, दिल्ली : २६-७-१९९६*

''आज के इस पावन पर्वपर प्रा.डॉ.अरविंद सदाशिव जोशी लिखित 'श्रीगुलाबरावमहाराज के जीवनी' का विमोचन का शुभ कार्य हो रहा है. यह अनेक भाषाओं में अनुवादित होकर सारे पाठकों तक पहुंचना चाहिए.

श्रीगुलाबरावमहाराज इतिहास के जिस काल में हमारे में आए, वह काल १९ वें शताब्दीका अंत और २० वें शताब्दीका प्रारंभ था. उस समय भारतीय समाज में आत्मग्लानी की भावना पैदा करनेका प्रयास किया जा रहा था. पश्चिम का प्रभाव बढ रहा था.

इस अवसर पर संतों की एक मालिकानें हमारे बीचमें





अवतरित होकर राष्ट्रीय निष्ठाओं को बनाएं रखा. उन्होंने आत्मविस्मृति हटाकर एक राष्ट्रीय चेतना पैदा की. यह चेतना सामाजिक, सांस्कृतिक और धार्मिक क्षेत्रों में पहले निर्माण हुई. इस चेतना से समाज को बल मिला और समाज की निष्ठाएं शक्तिशाली हुयी. भक्ति और आत्मविश्वास फिरसे लौटे, (भलेहि हम अपने स्वाधीनता को खो चुके थे) क्यों कि हमारी संस्कृति और हमारी जीवनपद्धति जिस प्रकारसे गढी गयी है, वह किसी भी संकट का सामना करनेके लिए समर्थ है.

छोटीसी उमर में, गरीब घर में जन्म लेकर, जन्मके थोडे महिने बाद आखों की दृष्टि खो बैठने के पश्चात् भी श्रीगुलाबराव महाराजने जो कुछ योगदान दिया है, वह सचमुच में आदि शंकराचार्य महाराज की स्मृति को ताजा करनेवाला है.

समाज के लिए लेखनी उठाना और बोलकर ग्रंथों को तय्यार करना, ऐसे वह ग्रंथ लिखवाते थे. ग्रंथ में शास्त्रशुद्ध पद्धति से विषयों का प्रतिपादन; तथा खंडन करते हुए भी उनकी

समन्वय की दृष्टि थी.

उन्होने भक्ति और अद्वैत का अंतर मिटाया.

ज्ञान,कर्म,भक्ति इन विषयोंकी हम चर्चा करते है उनका गीतामें विशेष रूपसे उल्लेख आता है.

ज्ञान कठिन है.
ज्ञान गंभीर है.
ज्ञान शुष्क भी होता है.
ज्ञान कोरा अभिमान भी पैदा करता है.
कर्म कठिन कार्य है.
कर्म के प्रति आसक्ति होती है.
फिर उसके साथ फलपर भी दृष्टि रहती है.लेकिन् –
भक्ति इन दोनोंसें अलग खडी है.
उस में कुछ प्रप्ति का भाव नही है.
वह रसामृत से भरी हुयी है.
उस मे शुष्कता नही है.
सारे भेदों को मिटाती हुई भक्ति की लहर चलती है.

हम अपने इतिहासपर नजर डालें तों जब जब समाज





का मानस कुंठित हुआ था - निराशा में डुबा था, तों सारे देश में, केवल एक भाग में नहि, देश के सभी भागों में, सभी भाषाओं में एक भक्ति की लहर उठी थी. लोगों का मनोबल बढा था. भक्तिसाहित्य की लहर से लोगों को शक्ति दियी थी.

यह शक्ति भगवान् से जुडी थी, इसलिए भक्त प्रार्थना करता था कि, ''जिन गुणों का समुदाय हम भगवान् में देखते है, उसमें से एक अंश, एक छोटासा अंश, हमे भी प्राप्त हो.''

इस भाव से समाज को बडी शक्ति मिली.

श्रीगुलाबरावमहाराजने मधुर भक्ति की बात की.चिंतन की एक नयी दिशा खोली.

भक्ति केवल एकात्मक नहि किन्तु सर्वात्मक है. इसी के कारण सारे समाज मे जागृति पैदा हुयी.

मैं यह पुस्तक देख रहा था.बडे परिश्रम से जोशीजीने इस पुस्तक का लेखन किया है.

इसे एक संयोग ही मानना चाहिएं, कि माननीय मोरारजी भाई प्रधानमंत्री थे, यहीं पर जब श्रीगुलाबरावमहाराज के विचारसंपदा का प्रकाशन उन्होंनें किया था, तब भी मैं उपस्थित था. उसके लेखक डॉ.घटाटे भी आज यहां उपस्थित है.





(२०.९.७८)

इस पुस्तक में लिखा है कि श्रीगुलाबरावमहाराजने उनके गृहस्थाश्रम की तथा गृहकलह की भी चर्चा की है. गृहकलह से शायदही कोई बच पाता है.

महाराजने किया हुआ पाश्चात्य अपसिद्धान्तों का खंडन यह एक अभ्यास का विषय है. किंतु खंडन करतें समय भी समन्वय की दृष्टि उन्होंने कभी नही छोडी.

फिर भी अभिनव चिंतनपद्धति से पाश्चात्यों के गलत विचारों का उन्होंने खंडन किया.

मैं सामने एक छोटीसी पुस्तिका देख रहा हूं.

पिछले पन्नेपर लिखा है कि उनको सर्वधर्मसमभाव के उपलक्ष्य में प्रश्न पूछा गया था -

''यदि सर्व धर्म समान है तों अपनेहि धर्म में क्यों रहना? सर्व धर्म समान है तों किसी और धर्म में जा सकते है''

श्रीगुलाबरावमहाराजने उत्तर दिया कि -

सभी धर्म समान है तों अपने धर्म को छोडकर जानेकी क्या जरूरत है?''

कितना सहज और सटिक उत्तर है !

जैसा - गागर में सागर भर दिया है.





लोग सर्वधर्मसमभाव का हमें बहोत उपदेश देते है - वों तो हमने गुट्टीसे पिया है. इसके लिए हमे बाहर से उपदेश लेने की आवश्यकता नही है. लेकिन ''परधर्मो भयावहः'' है. अपने धर्म पर डटे रहना यह भी एक शिक्षा है, यह भी संस्कार है. इस तरह की बहुतसी सामग्री आपको इस पुस्तक में मिलेगी. 'मधुराद्वैत' एक गंभीर अध्ययन का विषय है.

यह पुस्तक जों मराठी में है सों अन्य भाषाओं में भी आनी चाहिए. महाराज के विचारोंपर चर्चा होनी चाहिए. श्रीगुलाबरावमहाराज के हमारे उपर बहोत ऋण है.सभी भाषाओं में इनके बारे में जानकारी होनी चाहिए. और वह सभी दूर पहुंचेगी ऐसा विश्वास है.

आज के इस पावन पर्व पर परम पूजनीय रज्जुभैय्याजी की उपस्थिति है, जिससे आज के गुरुपौर्णिमा का महत्व भी बढ गया.वो इलाहबाद में विज्ञान के प्राध्यापक के रूप मे थे. बहोत से हमारे मंत्रीमंडल के सदस्य उनके शिष्य थे.मैने विज्ञान पढा नही और यदि पढता तों उनका शिष्य होनेसे मै भी सौभाग्य तथा गौरव का अनुभव करता.उनके उपस्थिती के लिए बहोत बहोत धन्यवाद ! ०००

८

# डॉ. श्रीकांत जिचकार

**श्री कात्यायनी व्रताची शताब्दी माधानः१३ एप्रिल २००३**

श्री गुलाबरावमहाराज काय आहेत हे माधानच्या लोकांना आम्ही सांगण्याची गरज नाही. पण माधानाच्या या कार्यक्रमाद्वारे महाराजांचे ज्ञानकार्य जगभर पसरावं, देशभर पसरावं, महाराष्ट्रातल्या, विदर्भातल्या लोकांना त्यांच्याबद्दल पूर्णत्वाने कल्पना यावी, हा या ज्ञानयज्ञाचा उद्देश आहे. महाराज ३४ वर्ष जगले, वयाच्या ९ व्या महिन्यात आंधळे झाले तरी वाचण्याकरता ते ग्रंथ जमा करायचे, ते वाचून घेण्याकरतां लोक जमा करायचे, त्यांना जवळ बाळगायचे. अडचणीच्या परिस्थितीत केवढं कठीण ! पण त्यांनी कष्ट सोसून सर्व काही केलं. अल्प आयुष्यात १३३ ग्रंथ लिहिलेत. यातील ३० ग्रंथ आणि काही पत्रेसुद्धा संस्कृतात आहेत. पैकी ९ सूत्रग्रंथ आहेत.

गहन अर्थासाठी कमीत कमी शब्द वापरून जे लिहायचं त्याला सूत्र म्हणतात. व्यासांनी ब्रह्मसूत्रे लिहिली. त्यावर २५०० वर्षांनी शंकराचार्यांनी भाष्य लिहिलं. पहिल्या सूत्रावरचं भाष्यंच २० पानी, भाष्य समजण्यासाठी टीका म्हणजे कामेंट्री ती शेकडो पानी, असे असतात सूत्र ग्रंथ. असे ९ सूत्रग्रंथ महाराजांनी





लिहिले. त्यांनी भाष्यं लिहिलीत, न्यायदर्शनावर लिहिलं, वैशेषिकावर लिहिलं, सांख्यावर लिहिलं. आमच्या सारख्यांची बुद्धि चालत नाही, एवढं प्रचंड कार्य गुलाबरावमहाराजांनी केलं आहे. त्यांनी बुवाबाजी आणि चमत्कारावरही लिहिलं आहे. डार्विन- स्पेन्सर- हॅमिल्टन यांच्यावरहि लिहिलं आहे. या मॉडर्न जगातही गुलाबरावमहाराज हे एक आश्चर्यच आहेत. महाराजांचे विचार एकत्रित समजून घेतां यावे म्हणून दत्तात्रेय महाराज खापरेजींनी एन्सायक्लोपिडिया = माधुर्यमधुकोश तयार केला. त्यात १६०० विषय आहेत. ॲटम शब्दावर ३ एंट्रीज आहेत. अन्तःकरणावर ३७ एंट्रीज आहेत. ईश्वरावर ३४७ आहेत. धर्मावर ३०५ आहेत. त्यात धर्माची जरूरी, धर्माचे आधिदैविक रूप, धर्माच्या ४ पायांच्या क्षीणतेचे कारण, धर्माचे राजकीय दृष्ट्या महत्व, सगळं त्याच्यात आहे. या अंध महात्म्याला एन्सायक्लोपिडिक माणूसच म्हणावं लागेल.

त्यांचा सर्वधर्मसमन्वय आजच्या काळात सर्वात महत्वाचा विषय ! त्यात त्यांनी समन्वयाचे ९ प्रकार सांगितले. अनेक ठिकाणी त्यांनी खंडन केलं, मंडन केलं, पण पुनः त्याचा समन्वयही करून दाखविला म्हणून ते समन्वयमहर्षी झालेत. त्यांनी द्वैत-अद्वैत-विशिष्टाद्वैत या सर्वात समन्वय तर केलाच पण आपल्या धर्मात असलेल्या सर्व पंथांच्या तत्तवांचा समन्वय करून दाखविला. एवढेच नव्हे तर इस्लाम, ख्रिश्चन या धर्मातील





तत्तवांचाही समन्वय अभ्यासकांपुढे ठेवला.

हे सारं कार्य मागच्या शतकाच्या सुरवातीला झालं. एवढं अफाट कार्य त्यांनी केलं म्हणूनच हा ज्ञानयज्ञ आपण इथं साजरा करतोय. ''आपल्याला गुलाबरावमहाराजांचं ज्ञानभंडार सर्व जगात पोहोचवायचं आहे. मराठीतून हिंदीत आणायचं आणि सर्व जगाला समजण्यासाठी इंग्रजीतही न्यायचं आहे.

विदर्भाचं आगळेपण वेगळंच आहे. देवी सरस्वती जगात सर्वत्र फिरत असते, परंतु मुलाला जन्म देण्यासाठी ती विदर्भाच्या भूमीत येते. ''विदर्भविषया सारस्वती जन्मभूः'' त्या भगवती सरस्वतीचा एक पुत्र या माधान गांवी जन्माला आला. त्यानं जे काम केलं ते अफाट ! आदि शंकराचार्यांनंतर एवढी मोठी ग्रंथसंपदा कुणी एका माणसाने भारतात निर्माण केलेली नाही.

मी 'माधुर्यमधुकोश' घेऊन ऋषिकेशला गेलो होतो. त्याच्यातल्या एंट्रीज पाहून ऋषिकेशचे महात्मा लोक आश्चर्यचकित झाले. स्वामी दयानंदसरस्वती, आर्ट ऑफ लिव्हिंगचे श्री रविशंकर, स्वतंत्रानंद, सुंदरचैतन्य, विद्यानंदगिरी, अवधेशानंदगिरी असे मोठे मोठे लोक होते. सर्वांनी पूर्वजन्माच्या सुकृताचं रूप म्हणून गुलाबरावमहाराजांना पाहिलं. सर्वजण महाराजांपुढे नतमस्तक झाले. ० ० ०





## कार्याचा आलेख

*(इ.स.१८८१ ते १९१५)*

**''युक्तीने पटवून देण्याचा माझा बाणा आहे''**

प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबरावमहाराज म्हणजे विदर्भातील माधानचे गुलाब गुंडोजी मोहोड. नवव्या महिन्यात दृष्टी गेलेली, माधानसारख्या खेड्यातील जीवन, शिक्षणाचा अभाव आणि आयुष्य केवळ ३४ वर्षे ! अशी सर्वतः विपरीत परिस्थिती असूनही महाराजांनी केलेल्या वैचारिक लेखनरूप ज्ञानयज्ञाचे आयाम विशाल आणि अजोड आहेत.

श्रीमहाराजांची श्रीकृष्णाचे ठिकाणी माधुर्यभक्ती असल्याने ते स्वतःला ज्ञानेश्वरकन्या आणि कृष्णपत्नी म्हणवीत.

श्रीमहाराजांनी ''श्रीज्ञानेश्वर मधुराद्वैत संप्रदाय'' प्रवृत्त केला. हा नाथसंप्रदाय असून उपास्यत्वेकरून वारकरी पंथाची शाखा आहे.

संतांची ज्ञानोत्तर पराभक्ती आणि शंकराचार्यांचा अद्वैतवेदान्त यांचा समन्वय करून शास्त्रीय खंडनमंडन पद्धतीने भक्तिशास्त्राची नवीन स्वरूपात मांडणी केली.

भगवंताचा सगुण विग्रह मिथ्या नसून सच्चिदानंदघन शुद्ध ब्रह्मस्वरूप आहे. तो ज्ञानानेही नाश पावत नाही, यासाठी अगदी





(६१)

नवीन शब्दयोजना सुचवून

**''शंकराचार्यांच्या अद्वैतात 'अनध्यस्तविवर्त' या भक्ति-संकल्पनेचे नवे योगदान दिले.''**

जगातील सर्व धर्मांत आणि हिंदुसमाजातील विभिन्न घटकात परस्पर द्वेष वाढू नये म्हणून महाराजांनी समर्थ असा **''सर्वधर्मसमन्वयाचा मूलगामी सिद्धान्त''** जगापुढे मांडला.

आर्य-अनार्य, आर्य-दस्यु, आर्य-द्रविड, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, उत्तर-दक्षिण, इत्यादि द्वेषभावनेला आणि त्यामुळे उत्पन्न झालेल्या असंतोषाला मूठमाती देण्याचे समन्वयरूपी प्रभावी हत्यार विचारवंतांच्या हाती दिले.

* शांकर अद्वैत आणि भक्तीचा पूर्ण समन्वय.
* भक्तिशास्त्राची निर्मिती.
* भक्तीच्या नव्या १६ प्रकारांची मांडणी.
* ज्ञान, उपासना आणि भक्तीतील भेदविवेचन.
* माधुर्यभक्तीवरील आक्षेपांचे निराकरण आणि तिच्या सर्वो□तेचे शास्त्रीय प्रतिपादन.
* भगवद्‌विग्रहाचे अनध्यस्तविवर्तत्व : शांकर वेदान्तात नवीन परिभाषा.
* नाममहात्म्य अर्थवाद आहे या आरोपाचे सविस्तर खंडन.



(६२)

* योगी, ज्ञानी व भक्त यांच्यातील सूक्ष्म भेदांचे प्रतिपादन.
* धर्म आणि तत्त्वसमन्वयाच्या नऊ प्रकारांचे विवेचन.
* षड्‌दर्शने परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत याची नवीन संदर्भात मांडणी.
* सांख्य सेश्वर आहे याची सप्रमाण सिद्धी.
* आधुनिक योग्यांच्या कुण्डलिनी-चक्रे-नाड्यांसंबंधी चुकीच्या संकल्पनांचे खंडन.
* योगदर्शनात अनेक नवीन प्रक्रियांची निर्मिती.
* स्वप्नातून परमार्थ प्राप्तीची प्रक्रिया.
* आन्तर् आणि बाह्य समाधीचे नवे मूलगामी विवेचन.
* पूर्व मीमांसेचे काही अंशी खंडन व उत्तरमीमांसेसाठी तिचा उपयोग.
* उत्क्रांतिवाद, अणुवाद, अज्ञेयवाद, संशयवाद वगैरे पाश्चात्य तत्त्वज्ञानांची भारतीय सिद्धांताशी तुलना आणि मूल्यमापन.
* नीतिशास्त्रातील युरोपियन मतांचे खंडन.त्यांचा भारतीय नीतीशी वेगळ्या रीतीने समन्वय.
* दैनंदिन सदाचाराचा उपदेश.
* पाश्चात्य आणि भारतीय मानसशास्त्रांशी तुलना.
* ॲलोपॅथी व आयुर्वेदाची तौलनिक मीमांसा आणि मानसायुर्वेदाची निर्मिती.



(६३)

* **इस्लाम, ईसाई, पारशी, बौद्ध, जैन, वगैरे सर्व वैदिक धर्माच्या शाखा आहेत** या सिद्धान्ताचे प्रमाणपुरस्सर शास्त्रशुद्ध विवेचन.
* वर्णाश्रम व्यवस्थेचे मूल्यमापन.
* ब्राह्मण-ब्रह्मणेतरवाद आणि आर्य-अनार्य वादांसंबंधी तौलनिक विवेचन.
* बुवाबाजीचा दंभस्फोट.
* धर्मसंकर, धर्मसुधारणा आणि धर्मसमन्वय यातील भेद विवेचन.
* वेदांवर आणि पुराणांवर समन्वयात्मक सूत्रग्रंथांची रचना.
* प्राचीन आर्यांची विविध शास्त्रे आधुनिक विज्ञानाचे आणि तत्त्वज्ञानांचे मूळ स्त्रोत असल्याचे युक्तिसिद्ध प्रतिपादन.
* न्याय वैशेषिकातून प्राचीन आर्यांचे भौतिक विज्ञान कसे विकसित करावे, याचे मार्गदर्शन.
* मनोविज्ञान, काव्यशास्त्र, संगीत, आयुर्वेद वगैरे शास्त्रांचे षड्‌दर्शनानुसार प्रस्तुतीकरण.
* इतिहास कोणी कसा लिहावा, आणि कोणत्या इतिहासावर विश्वास ठेवावा ? याचे मार्गदर्शन.
* आर्य वंश नाही, आर्य बाहेरून आले नाहीत, शूद्र वर्ण हा आर्यांचाच भाग आहे या ऐतिहासिक सत्याचे मुद्देसूद प्रतिपादन
* उत्तरधृवीय मताचा परामर्श.
* तीन हजार वर्षापूर्वी आर्य संस्कृती विश्वव्यापक होती या



(६४)

ऐतिहासिक सिद्धान्ताची पुनर्स्थापना.

* डार्विन, स्पेन्सर, ॲनीबेझंट वगैरेंच्या उत्क्रांतिवादाचे खंडान.
* सुधारणा आणि बहुमत यांचे संबंधी परखड विचार.
* शिक्षणासंबंधी मूलभूत विचार.
* प्राचीन व अर्वाचीन संगीताची तुलना, भातखंडेंचे खंडन व तात्त्विक प्रश्नांचा उहापोह.
* प्राचीन सूत्र कायम ठेवून नवीन साहित्यशास्त्राची निर्मिती.
* ''प्रक्षिप्त आणि भाषाभिन्नतेवरून लेखकभिन्नता'' हे आधुनिक संकेत संत-साहित्याला वा आर्ष-वाङ्‌मयाला लागू पडत नाहीत याचे स्व-उदाहरणावरून प्रतिपादन.
* कौटुंबिक व सामाजिक संबंधात प्रश्नोत्तर रूपाने मार्गदर्शन.

— असो ॥

बालपणी नवव्या महिन्यात नेत्रहीन झालेल्या महाराजांच्या केवळ ३४ वर्षाच्या अल्पायुष्यात झालेल्या या सर्व ज्ञानशाखांना कवेत घेणारा मूलभूत वैचारिक योगदानाचा विचार केला असता-अल्पवयात अजोड कार्य करणाऱ्या पूज्यपाद श्री आद्य शंकराचार्य व श्रीज्ञानेश्वर महाराज यांचीच आठवण येते आणि भारतातील महर्षी भगवान श्रीव्यासांच्या सर्वस्पर्शी ज्ञानपरंपरेचा स्त्रोत अखंड असल्याची जाणीव होते. ०००



## ''महाराज सर्वदूर पोचतील''

प्रधानमंत्री श्री मोरारजीभाई देसाई

मला आनंद वाटतो की, आपण प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबरावमहाराजांची जन्मशताब्दी साजरी करणार आहात- तीही तीन वर्षे ! ...परंतु हा केवळ कागदी घोडा राहणार नाही अशी मला आशा आहे. सर्वदूर महाराजांचे विचार पोहचतील असे करा....

आपण जिथे आहात तिथे तरी महाराजांच्या विचारांचा प्रसार होईल असे प्रयत्न करू शकता.

योग्य ठिकाणी त्यांचे विचार पोहोचले तरच ते सर्वदूर पोहोचतील! (दिल्ली २०-९-१९७८)




## अनुक्रम


| | |
|---|---|
| १. सर्वस्पर्शी प्रज्ञा | २ |
| २. साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर | ९ |
| ३. माननीय दत्तोपंत ठेंगडी | १२ |
| ४. पूजनीय गुरुजींशी संवाद : ऋणानुबंध | २३ |
| ५. जन्मशताब्दीचा वृत्तांत | ३६ |
| ६. प्रधानमंत्री मोरारजी देसाई २०-९-१९७८ | ४२ |
| ७. प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी २७.६.१९९६ | ५१ |
| ८. डॉ. श्रीकांत जिचकार २००३ | ५७ |
| ९. कार्याचा आलेख | ६० |





## प्रभावी समन्वय विचार

*-परमपूजनीय श्री गुरुजी गोळवलकर*

**''श्रीगुलाबरावमहाराजांचा समन्वयविचार म्हणजे देशातील सामाजिक बंधुभावाला महाराजांनी दिलेले तात्त्विक अधिष्ठान आहे.''**

**या समन्वयविचाराचे फार दूरगामी परिणाम होण्याजोगे आहेत. मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, बौद्ध वगैरे उपासना-मार्गातील प्रमुख तत्त्वे, त्या त्या धर्मापेक्षा ऐतिहासिक दृष्टीने प्राचीन असलेल्या हिंदुसंस्कृतीत म्हणजे वैदिक आर्यसंस्कृतीत कशी सापडतात, याचे त्यांनी विवेचन केले. त्यासंबंधी महाराजांनी दाखविलेली दिशा महत्वपूर्ण आहे त्यानुसार प्रबोधन झाले तर केवळ भारतीय समाजच एकात्म होईल असे नसून जगातील सर्व धर्मांचे समाज परस्पर सामंजस्याने राहूं शकतील. इतका महाराजांचा समन्वय विचार प्रभावी आहे.**

(नागपूर मार्च १९७३)